



# पारनेर दर्शन








वर्ष १ अंक १३०, बुधवार ३१ जानेवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# १०५ कि मी शेतपाणंद रस्त्यांसाठी २५ कोटींचा निधी

■ आमदार नीलेश लंके यांची माहीती ■ मतदारसंघातील ३६ गांवांना होणार लाभ





**पारनेर : प्रतिनिधी**

**राज्य शासनाच्या नियोजन विभागातील रोजगार हमी योजना प्रभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मातोश्री ग्रामसमृध्दी शेत पाणंद रस्ते योजनेअंतर्गत पारनेर-नगर मतदारसंघातील ३६ गावांमधील १०५ किलोमिटर अंतराच्या रस्त्यांसाठी २५ कोटी २० लाख रूपयांचा निधी मंजुर करण्यात आल्याची माहीती आमदार नीलेश लंके यांनी पत्रकारांना दिली.**

विविध गावांमधील शेतकरी वर्गाकडून शिव पाणंद रस्त्यांची अनेक वर्षांपासून मागणी करण्यात येत होती. मातोश्री ग्रामसमृध्दी शेत पाणंद योजनेअंतर्गत विविध गावांतील रस्त्यांसाठी नियोजन विभागाच्या रोजगार हमी योजना प्रभागाकडे पाठपुरावा करून जिल्हयात सर्वाधिक निधी मंजुर करण्यात यश आल्याचे आ. लंके यांनी सांगितले.

**या योजनेअंतर्गत विविध गावांमध्ये मंजूर झालेले रस्ते पुढीलप्रमाणे**

मुंगशी म्हसणे रोड ते वाघुळे शिव रस्ता, मुंगशी थोरात वस्ती ते वडनेर शिव रस्ता, मुंगशी थोरात वस्ती ते मुंगशी गाव शिव, मुंगशी गाव करपे वस्ती ते वडनेर शिव रस्ता प्रत्येकी १ किलोमिटर, निघोज गाडीलगांव रोड ते राजू ढवळे वस्ती पाणंद रस्ता, निघोज ढवळे मळा ते चेडे वस्ती पर्यंत खडीकरण प्रत्येकी १ किमी, पळशी साळवे वस्ती ते रानमळा शेत पाणंद रस्ता, पळशी वनकुटा डांबरी रस्ता ते महारकार वाडी शेत पाणंद रस्ता, पळशी वारे वस्ती पठार ते पठार ते पठार डांबरी रस्ता शेत पाणंद रस्ता प्रत्येकी १ किमी

भाळवणी निमगांव शिव शेत पाणंद रस्ता १ किमी, लोणीमावळा पडवळ मळा ते लाळगे मळा शेत पाणंद रस्ता, लोणीमावळा लाळगे मळा ते चासकरवाडी रस्ता प्रत्येकी १ किमी, भोयरे गांगर्डा पवार वस्ती ते सारोळा रस्ता मजबुतीकरण १ किमी, भोयरे गांगर्डा रसाळ वस्ती ते कोकाटे वस्ती रस्ता, वडगांवसावताळ वासुंदे रस्ता ते गव्हाळी शेत पाणंद रस्ता, वडगांव सावताळ निवडूंगे वस्ती ते माडी वस्ती रस्ता, वडगांव सावताळ दाते वस्ती रस्ता ते शंकरबाबा मंदिर तरटी फाटा रस्ता, वडगांव सावताळ शिंदे मळा ते महादेव मंदिर शिंदे मळा रस्ता, वडगांव सावताळ गव्हाळी रस्ता ते खराबी वस्ती रस्ता

वडगांव सावताळ जामगांव रस्ता ते पांढरी वस्ती रस्ता, वडगांव सावताळ मोहिते ते अशोक रोकडे वस्ती रस्ता, वडगांव सावताळ खरबी वस्ती ते मोहिते वस्ती रस्ता, वडगांव सावताळ वनकुटे रस्ता ते सावताळ बाबा रस्ता, वडगांव सावताळ तांबेवाडी ते माळवाडी रस्ता, म्हसोबा झाप गुरेवाडी येथील चाळक फाटा ते चिकणे वस्ती रस्ता, म्हसोबा झाप बेलकर वस्ती ते मळगंगा फाटा रस्ता, म्हसोबा झाप झगडा फाटा ते गाजरे झाप रस्ता, जेडगुले वस्ती ते वाकुंर झाप रस्ता, म्हसोबा झाप गणेशवाकळे फाटा ते वाळुंज झाप रस्ता, म्हसोबा झाप हरी बाबा मंदिर फाटा ते आरोटे वस्ती रस्ता, म्हसोबा झाप भानुदास आहेर घर फाटा ते वाघवाडी रस्ता, सावरगांव जगन्नाथ चिकणे वस्ती ते गांजे वस्ती रस्ता, सावरगांव गांजे वस्ती ते चिकणे वस्ती रस्ता, सावरगांव बुध्द विहार ते घनदाट वस्ती रस्ता सावरगांव संत रोहिदासनगर ते नगर कल्याण हायवे रस्ता, सावरगांव काळेवाडी ते व्हरूंडी रस्ता, काळेवाडी, सावरगांव राळे वस्ती ते चौधरी वस्ती रस्ता, काळेवाडी, सावरगांव लांडगेवाडी ते कानिफनाथ मंदिर रस्ता, ढोकी बरकडे वस्ती ते वाकचौरे वस्ती रस्ता, ढोकी नगर कल्याण हायवे ते मोठे वस्ती रस्ता, तिखोल बिरोबा केटी ते सखाराम मंचरे घर रस्ता, ढवळपुरी जुना गावडेवाडी रस्ता, ढवळपुरी वाघवाडी ते तांबटीमळा जुना ढवळपुरी रस्ता, ढवळपुरी शिनारमाथा ते तांबदीमळा रस्ता, ढवळपुरी भनगडेवाडी ते वाघवाडी-ढवळपुरी रस्ता, ढवळपुरी खारवाडी ते खताळ वस्ती रस्ता, ढवळपुरी कोकणेवाडा खताळ वस्ती रस्ता, सांगवी सुर्या जवळा पिंपळनेर रस्ता ते नगरे वस्ती रस्ता, कळस कळस गावठांण ते गणेशवाडी रस्ता, कळस गणेशवाडी ते बारासना रस्ता कळस बारसना ते कळस कुरण हद्द रस्ता, कळस कुरण हद्द ते नांदुरपठार हद्द रस्ता, बेल्हे पिंपळगांव रोठा रोड ते पळस पाटी रस्ता, टाकळीढोकेश्वर बाबासाहेब झावरे ते मुक्ताई मंदिर खिलारी पठार भोंद्रे शिव रस्ता, टाकळीढोकेश्वर निवडूंगेवाडी ते पांडूरंग व्यवहारे रस्ता, टाकळीढोकेश्वर तराळ पठार ते वारसौड रस्ता, रांधे ते श्रीहरी वाडी रस्ता, वाडेगव्हाण खंदारे मळा ते यादववाडी रस्ता, वाडेगव्हाण तरवडी रस्ता ते गवळी मळा रस्ता, वाडेगव्हाण सरकारी विहीर ते स्मशानभुमी रस्ता, वाडेगव्हाण नगर पुणे हायवे ते पिंपळनेर रस्ता, करंदी भिल्ल वस्ती ते उंबरदरा घाट ते महादेव मंदिर रस्ता, करंदी गवराम चौधरी ते काळे वस्ती रस्ता, हत्तलखिंडी बस स्टॉप ते पिंराचा दरा रस्ता, हत्तलखिंडी मराठी शाळा ते फासवाट रस्ता, बाबुर्डी बस स्टॉप क्र.२ ते टोकडवस्ती रस्ता, बाबुर्डी चिंचेचा मळा ते पळवे शिव रस्ता, बाबुर्डी विसापुर रोड ते शिवाजीनगर रस्ता, बाबुर्डी बस स्थानक क्र.१ ते सोनवाडी रस्ता, बाबुर्डी टोकड वस्ती ते चिंचेचा मळा रस्ता,बाबुर्डी टोकड वस्ती ते समान मळा रस्ता, काताळवेढे विठ्ठलवाडी ते चोळी वस्ती रस्ता, काताळवेढे चोळी वस्ती ते डोंगरवाडी रस्ता

कान्हूरपठार किन्ही रोड ते चत्तर वस्ती रस्ता, कान्हूरपठार चत्तर वस्ती ते पिंपळगांव तुर्क रस्ता, कान्हूरपठार काकणेवाडी रस्ता ते नवलोबा रस्ता, वाळवणे गावठाण ते थिटे मळा रस्ता, वाळवणे गावठाण ते पठारे वस्ती रस्ता हंगा शहांजापुर रोड ते लक्ष्मी मंदीर ते बाबा नवले वस्ती रस्ता, हंगा बाबा नवले वस्ती ते अरूण नगरे वस्ती रस्ता, हंगा सुपा रोड ते मदने वस्ती इरिकेशन टँक रस्ता.

## नगर तालुका

हिवरे झरे स्मशानभूमी ते सुभाष भापकर वस्ती शेत रस्ता, हिवरे झरे काळेवाडी रोड ते रावसाहेब भापकर रस्ता, वाकोडी परीटनाला ते सुदाम घोलप घर रस्ता, वाकोडी वाळकी रोड ते नवनाथ यादव घर रस्ता, वाकोडी कोंडी वाळूंज रोड बाबा खांदवे घर ते वाकोडी मार्केट यार्ड सुदाम गवळी घरापर्यंत रस्ता, खडकी नगर दौंड हायवे ते प्रशांत कोठुळे घरापर्यंत रस्ता, पिंपळगांव कौडा बनकर वस्ती पुलासहित रस्ता, भोयरे पठार सालेया वस्ती रस्ता, निमगांव वाघा चास पिंपळगांव रोड ते जाधववाडी शिव रस्ता, निमगांव वाघा चास रोड ते कापसे वस्ती रस्ता, चास भोरवाडी चास भोरवाडी शिव ते कामरगांव भोरवाडी शिव रस्ता, भोरवाडी यशवंत भोर यांचे शेत ते गुलाब भोर यांचे शेत रस्ता.

## शिंगवे नाईक येथे सर्वाधिक रस्ते

**शिंगवे नाईक येथील तब्बल १४ रस्त्यांना निधी मंजुर करण्यात आला असून त्याचा तपशिल पुढील प्रमाणे :**

नगर मनमाड रोड ते जयसिंग काळे शेत रस्ता, नगर मनमाड रोड ते देवनदी रस्ता, जुना देहरे-शिंगवे शेत रस्ता, साळवे वस्ती ते कल्हापुरे वस्ती रस्ता, कल्हापुरे वस्ती ते बोरूडे मळा रस्ता, साळवे वस्ती चौक ते पुंड वस्ती शिंगवे शेत रस्ता, जाधव वस्ती शिंगवे ते सोम्माबापू बोरूडे घर रस्ता, आगाऱ्याचा ओढा ते लगे वस्ती ते जाधव वस्ती इस्मालपुर शेत रस्ता, शिंगवे इस्मालपुर रस्ता ते विकास शिंदे घर रस्ता, विकास शिंदे शेतापासून कारभारी धामणे वस्तीपर्यत रस्ता, कारभारी धामणे शेतीपासून विठ्ठल महांडुळे खालीची कोळयावाडी पर्यंत रस्ता, विठ्ठल महांडुळे शेतीपासून वांबोरी शिरस्त्यापर्यंत रस्ता, हनुमान मंदीर ते मोदवे वस्ती इस्लामपुर शेत रस्ता, वांबोरी रस्ता ते चौधरी मळा रस्ता.

## जिल्हयात सर्वाधिक निधी

नगर जिल्हयातील सर्व तालुक्यांसाठी एकूण ३१६ किलोमीटर रस्त्यांच्या कामासाठी निधी मंजुर झाला असून त्यापैकी सर्वाधिक १०५ किलोमीटरसाठी निधी पारनेर-नगर मतदारसंघासाठी खेचून आणण्यात आ. नीलेश लंके यांना यश आले आहे.

## गावे व रस्त्यांची संख्या या योजनेअंतर्गत पारनेर-नगर मतदारसंघात रस्त्यांच्या कामांना मंजुरी मिळाली गावे व रस्त्यांची संख्या पुढीप्रमाणे:

मुंगशी ४, निघोज २, पळशी ३, भाळवणी १, लोणीमावळा २, भोयरे गांगर्डा २, वडगांव सावताळ/ गाजदीपुर १०, म्हसोबा झाप ७, सावरगांव काळेवाडी ७, ढोकी २, तिखोल १, ढवळपुरी ७, सांगवी सुर्या १, कळस ५, टाकळीढोकेश्वर ३, रांधे १, वाडेगव्हाण ४, करंदी २, हत्तलखिंडी २ बाबुर्डी ६, काताळवेढे २, कान्हूरपठार ३, वाळवणे २, हंगा ३, हिवरे झरे २, वाकोडी ३, खडकी १, पिंपळगांव कौडा १, भोयरे पठार १, निमगांव वाघा २, चास भोरवाडी १, भोरवाडी १, शिंगवे नाईक १४.

# घनदाट मामा म्हणाले, लंके साहेब खासदारकी लढवा!

नांदुरपठार येथील कार्यक्रमात सिताराम घनदाट यांची ऑफर



■ नांदूरपठार येथे विविध विकास कामांच्या भुमिपुजन व लोकार्पण कार्यक्रमात आ. नीलेश लंके यांनी मा. आ. सिताराम घनदाट यांचा सन्मान केला.

**नांदूरपठार : विशेष प्रतिनिधी**

**२४ तास ३६५ दिवस काम करणारा आमदार संपूर्ण राज्यालाच नव्हे तर देशालाही भावला असून आता आमदार साहेब तुम्ही लोकसभेची निवडणूक लढवा, नांदूरपठार हे गाव संपूर्ण गाव तुमच्या पाठीशी खंबिरपणे उभे राहिल अशी ऑफर माजी आमदार सिताराम घनदाट यांनी आ. नीलेश लंके यांना दिली.**

नांदूरपठार येथील विविध विकास कामांचे

उर्वरीत पान ३ वर

## ११ कोटी ५३ लाखांची विकास कामे

यावेळी ९ कोटी ७३ लाख रूपयांच्या कामांचे भुमिपुजन तर १ कोटी ८३ लाख रूपयांच्या कामांचे यावेळी आ. नीलेश लंके यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

## मतदारसंघ सुरक्षित राहिला पाहिजे !

राज्यात ,देशाच्या राजकारणात काहीही झाले तरी आपला मतदारसंघ सुरक्षित राहिला पाहिजे अशी आपली भूमिका आहे. सन २०१९ मध्ये मी विजयी झालो, चांगल्या पायगुणामुळे सत्तेत सहभागी झालो. वर्षभर बाहेर राहिल्यानंतर पुन्हा सत्तेमध्ये आहे. त्यामुळे विकास कामांना चालना मिळाल्याचे यावेळी आ. लंके म्हणाले.

**मामांचे कर्तुत्व मोठे –** घनदाट मामा यांचे कर्तुत्व मोठे असून त्याचा अपणास सार्थ अभिमान आहे. विधानसभा निवडणूकीत त्यांनी मला मोठी मदत केली. नांदूरपठार हे गाव वैचारीक पातळी असेलेले गाव आहे. त्यामुळेच या गावाला मी मोठया प्रमाणावर निधी देऊ शकलो.

– आ. नीलेश लंके

## मामा शान तर लंके जान !

नेत्यांनी आमच्या गावाचा चेहरा मोहरा बदलला. कोरोना काळात स्वतः चा जीव धोक्यात घालून त्यांनी कोरोना रूग्णांची सेवा केली. त्यांच्या कार्यास माझा सलाम. घनदाटा मामा आमच्या गावाची शान तर आ. नीलेश लंके पारनेर तालुक्याची जान आहे .

आराध्य रविंद्र राजदेव, इयत्ता दुसरी









# टेकझोन

## ४१ कोटी फेसबुक युजर्सचे मोबाइल नंबर लीक



सोशल मीडिया साइट फेसबुक पुन्हा एकदा डेटा लीकमुळे चर्चेत आले आहे. यंदा तब्बल ४१९ मिलियन यूजर्सचे फोन नंबर लीक झाले आहेत. यात १३३ अमेरिकन युजर्स, १८ मिलियन ब्रिटिश युजर्स आणि ५० मिलियन व्हिएतनाम युजर्सचा डेटा आहे. पासवर्डने सर्व्हर सुरक्षित नसल्याने ही माहिती लीक झाली आहे. सिक्युरिटी रिसर्चर संयम जैन यांनी सांगितले, की ४१९ मिलियन फेसबुक युजर्सचा मोबाईल नंबर सार्वजनिक आहे. संयम जैनने फेसबुकच्या ऑनलाइन डेटाबेसचा शोध लावला आहे, ज्यात ४१९ मिलियन यूजर्सचे फोन नंबर लीक झाले आहेत. युजर आयडीपासून ते फोन नंबर आणि युजर्सचे खरे नाव, जेंडर आणि देशाची माहिती देखील लिक झाली आहे. सर्व्हरला पासवर्ड नव्हता. मात्र या रिपोर्टनंतर सर्व्हर ऑफलाइन करण्यात आला आहे. फेसबुकने या रिपोर्टवर म्हटले आहे की, हा डेटा जुना असून, तो याआधीच काढण्यात आला आहे. मागील वर्षीच कंपनीने यात बदल केले असून, त्यावेळी कंपनीने ते फिचर काढून टाकले आहे. या फिचरमुळे फोन नंबरद्वारे युजर्स कोणालाही शोधू शकत होते.

## क्रोम वापरताय?

**सर्वांत वेगवान आणि हाताळायला सोपे असणारे क्रोम ब्राऊझर आजघडीला जगभरात करोडो लोक वापरतात. गुगलने २००८ मध्ये हे ब्राऊझर उपलब्ध दिले होते आणि अल्पावधीत ते लोकप्रिय होऊन सफारी, फायरफॉक्स, मायक्रोसॉफ्ट एजला त्याने झोपवले. ब्राऊझर लोकांनी जास्तीत जास्त वापरावे यासाठी ते सुरुवातीपासूनच साधे आणि कमीत कमी इंटरनेट खर्च होईल असे विकसित करण्यात आले होते; पण यात कालांतराने अद्ययावत सुविधा देण्यात आल्या. ज्यामुळे तुम्ही तुमचे इंटरनेट ब्राऊझिंग अधिक चांगले व सुरक्षित करू शकता. या सुविधा कोणत्या हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरेल...**



### पाहुण्याची व्यवस्था करा...

आपला लॅपटॉप कुणी मागितला, तर त्यात आपण साठवलेली महत्त्वाची माहिती पाहू नये यासाठी ज्याप्रमाणे आपण वापरकर्त्यांमध्ये पाहुणा (गेस्ट) हा पर्याय ठेवतो. त्याचप्रमाणे आपल्या ब्राऊझिंगच्या गोष्टी लोकांनी पाहू नये यासाठी गुगल क्रोममध्ये आपण ब्राऊझिंगसाठीही पाहुणा (गेस्ट) वापरकर्त्यांचा पर्याय ठेऊ शकतो. यासाठी तुम्हाला सेटिंगमध्ये जाऊन पीपल हा पर्याय निवडावा लागेल तेथे एनेबल गेस्ट ब्राऊझिंग हा पर्याय निवडावा लागेल. हा पर्याय निवडल्यानंतर तुम्ही क्रोम लॉगइन केल्यावर उजव्या बाजूला येणाऱ्या तुमच्या वापरकर्ता नावावर क्लिक करून तुम्ही स्विच पर्सन हा पर्याय वापरून ब्राऊझर पाहुण्या वापरकर्त्यांसाठी खुला करून देऊ शकता.

### सर्व बुकमार्क दिसण्यासाठी...

क्रोमचा बुकमार्क बार हा खूपच लवकर भरतो, पण त्यानंतरही आपल्याला अनेक संकेतस्थळे बुकमार्क करून ठेवायची गरज असते; पण ते केल्यानंतरही ते संकेतस्थळ त्या बुकमार्क बारवर दिसत नाहीत. जर तुम्हाला ते संकेतस्थळ दिसावे असे वाटत असेल तर तुम्ही क्रोममध्ये बुकमार्क मॅनेजरमध्ये जा. तेथे सर्व बुकमार्कचे टायटल फिल्ड डिलीट करा. हे करत असताना लिंक डिलीट होणार नाही याची काळजी घ्या. यानंतर तुम्हाला त्या संकेतस्थळाचा छोटा लोगो दिसू लागेल.

### ओमनी बॉक्स करा सक्षम



तुमच्या ब्राऊझरचा ओमनी बॉक्स अर्थात आपण जेथे संकेतस्थळाचा पत्ता देतो ते ठिकाण अधिक सक्षम करता येणे शक्य आहे. म्हणजे यात आपण एखादे गणित सोडविण्यापासून ते एकक रूपांतरही करू शकतो. यासाठी गुगल सर्चमध्ये जाऊन एखादे संकेतस्थळ शोधून रूपांतर करण्याची गरज भासणार नाही. म्हणजे आपण त्या चौकटीत ५ फूट ते इंचेस असे टाइप केल्यावर आपल्याला उत्तर मिळू शकणार आहे. अनेकदा आपल्याला उत्तर आपण एन्टर बटण दाबण्यापूर्वीच मिळू शकणार आहे. या माध्यमातून आपण तापमान, अंतर आणि वजन अशा गोष्टींची माहिती मिळवू शकतो.

### संकेतस्थळ भेटीबद्दल...

तुम्ही एखाद्या संकेतस्थळाचा पत्ता टाकल्यावर ते सुरू होते. त्यानंतर तुम्हाला डाव्या बाजूला एक चिन्ह दिसते. त्या चिन्हावर तुम्ही क्लिक केल्यावर तुम्हाला तुम्ही जे संकेतस्थळ पाहात आहात, त्यात किती माहिती आहे, त्याची सुरक्षा यंत्रणा किती सक्षम आहे, हे संकेतस्थळ कुणी तयार केले आहे याचबरोबर संकेतस्थळांत किती कूकीज आहेत याचा तपशील मिळू शकणार आहे. ही माहिती आपण एखाद्या अनोळखी संकेतस्थळाला भेट देत असताना उपयोगी ठरू शकते.

### टास्क मॅनेजर

**तुम्ही वेगवेगळ्या टॅबमध्ये विविध संकेतस्थळे सुरू करता. अनेकदा एका टॅबवरील संकेतस्थळावर ट्रबल शूटिंगसारखी अडचण येते. त्या वेळेस तुम्हाला अनेकदा ब्राऊझर बंद केल्याशिवाय पर्याय राहत नाही. अशा वेळी तुम्ही क्रोमच्या टास्क मॅनेजरमध्ये जाऊन ते संकेतस्थळ निवडून त्याची प्रक्रिया थांबवू शकता. यामुळे तुम्हाला मुख्य टास्क मॅनेजर सुरू करून संपूर्ण क्रोम बंद करण्याची गरज पडणार नाही.**

### ▶ खूप मागे जाण्यासाठी...

आपण इंटरनेटचा वापर करत असताना एकामागून एक संकेतस्थळे सुरू करत असतो. साधारणत: एखाद तास इंटरनेटचा वापर केल्यानंतर आपण सर्वप्रथम जे संकेतस्थळ पाहिले होते त्या संकेतस्थळाला भेट द्यावी असे आपल्याला वाटते. अनेकदा आपण वेगवेगळ्या संकेतस्थळांवरून लिंक सुरू केलेल्या असतात. यामुळे आपल्याला त्या संकेतस्थळांचा पत्ता माहिती नसतो. अशा वेळी ते शोधून काढण्यासाठी बॅकचा पर्याय वापरला जातो. मात्र आपण किती वेळ हा पर्याय वापरणार. हे टाळण्यासाठी बॅक या पर्यायावर बराच वेळ क्लिक करून ठेवा. तेथे तुम्हाला तुम्ही भेट दिलेल्या संकेतस्थळांच्या लिंक्स दिसतील. त्यातील तुम्हाला पाहिजे ती लिंक तुम्ही निवडू शकता.

### ▶ शब्दार्थ जाणण्यासाठी...




आपण संकेतस्थळावर लेख किंवा पुस्तकातील काही तपशील वाचत असतो. हे वाचत असताना एखादा शब्द जर आपल्याला अडला, तर त्याचा अर्थ पाहण्यासाठी तो कॉपी करून डिक्शनरीसारख्या संकेतस्थळावर जाऊन त्याचा अर्थ शोधतो; पण गुगल क्रोममध्ये तुम्ही गुगल डिक्शनरी या टूलचा वापर करून तुम्ही तुम्हाला अडलेल्या शब्दावर दोन क्लिक केल्यावर त्यावर एका चौकटीत तुम्हाला त्याचा अर्थ समजू शकणार आहे. यासाठी तुम्हाला गुगलचा हा टूल सक्रिय करून घ्यावा लागणार आहे.

### ▶ सगळे सिंक करण्याची गरज नाही...

क्रोम वापरत असताना अनेकदा आपले पासवर्ड आणि ब्राऊझिंग हिस्ट्रीही त्या उपकरणात साठवून ठेवली जाते; पण हे सर्व सिंक करण्याची अर्थात साठवण्याची तशी गरज नसते. यामुळे तुम्ही सेटिंगजच्या पानावर जा. तेथे ॲडव्हान्स्ड सिंक सेटिंग्ज हा पर्याय निवडा. त्यानंतर तुम्हाला काय सिंक करून हवे आहे तेवढेच पर्याय निवडा. उर्वरित पर्याय काढून टाका, जेणेकरून तुमची माहिती सिंक होणार नाही व ती त्या उपकरणात साठवूनही ठेवली जाणार नाही.

## हे होतं कसं?

एखादी गोष्ट कशी कार्य करते हे जाणून घेण्याची उत्सुकता सर्वांनाच असते. मग त्या दृष्टीने आपोआपच आपला शोध सुरू होतो. म्हणजेच माहितीशी संबंधित पुस्तकांचे वाचन, जाणकार व्यक्तींशी चर्चा इत्यादी. सर्वात सोपा मार्ग म्हणजे गुगल सर्च. गुगलवर सर्च केल्यावर आपल्याला लाखोंच्या संख्येने रिझल्ट्स मिळतात; परंतु आपल्याला हवी असलेली माहिती सविस्तरपणे, पण अगदी सोप्या शब्दांत सांगणाऱ्या साइट्स अगदी मोजक्याच असतात. अशा साइट्सच्या यादीतील howstuffworks.com/ या साइटचे नाव प्रामुख्याने घ्यायला हवे. या साइटवर विविध विषय आणि त्यांच्या उपविषयांची माहिती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. लेख, विषयाशी संबंधित चित्रे, व्हिडीओ इत्यादी स्वरूपात ही माहिती आपल्याला येथे मिळवता येते.




उदाहरणादाखल, लहानथोरांना मोटारींचे अतिशय आकर्षण असते. या साइटवर ऑटो या विषयाखाली खूप मनोरंजक माहिती उपलब्ध आहे. मोटारींबद्दलच्या मूलभूत ज्ञानापासून त्यांची विविध प्रकारची मॉडेल्स, मोटारींच्या शर्यतींविषयी माहिती, ड्रायव्हिंग आणि सुरक्षितता, विविध प्रकारची इंधने व त्यांची कार्यक्षमता, मोटारींची खरेदी-विक्री यासारख्या विषयांवर उपयुक्त माहिती आणि व्हिडीओज येथे दिसतील. ॲनिमल्स या विषयाखाली निसर्गातली नवलाई उघडून दाखवलेली आहे. पाळीव प्राणी या विभागात विविध प्रकारच्या पाळीव प्राण्यांचे संगोपन, ते प्राणी एकमेकांशी कसा संवाद साधतात, त्यांना बरोबर घेऊन प्रवास करताना घ्यायची काळजी यांसारखी माहिती मिळेल. वन्यप्राणी आणि पक्षी यांच्याबद्दल तसेच जे प्राणी काळाच्या ओघात नष्ट झाले आहेत किंवा नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत त्याविषयी वाचायला मिळेल. त्याचबरोबर घोडा आणि झेब्रा हे दोन्ही प्राणी एकाच कुळातील असूनही आपण घोड्यावरून प्रवास करू शकतो; परंतु झेब्र्यावरून नाही, असे का? यासारख्या गमतीदार विषयांवरील माहिती देणाऱ्या व्हिडीओ क्लिप्स उपलब्ध आहेत. विज्ञान या विषयाखाली पर्यावरण, अवकाश, मिलिटरी, भौतिक विज्ञान आणि त्यांच्यातील नवनवीन शोधांची माहिती यासारखे नेहमीचे विषय आहेतच. याशिवाय विज्ञान आणि श्रद्धा-अंधश्रद्धा यावर एक उपविभाग आहे. थोर शास्त्रज्ञ आइनस्टाइनच्या मृत्यूनंतर त्यांच्या मेंदूचे वैद्यकीय विश्लेषण केले गेले. आइनस्टाइनचा मेंदू कसा कार्य करत असे या लेखात या संदर्भातील माहिती वाचायला मिळेल. अशा विविध माहितींचा खजिना या साइटवर लोकांना खुला करून दिलेला आहे. या खजिन्यात सतत नव्याने भर पडतेच आहे. या साइटवर बुद्धीला चालना देणाऱ्या बहुपर्यायी प्रश्नमंजूषा आहेत आणि या प्रश्नमंजूषा लेखांप्रमाणेच माहितीपूर्ण आहेत. तुम्ही योग्य अथवा अयोग्य पर्याय जरी निवडलात तरी तुम्हाला योग्य उत्तरासहित त्याचे स्पष्टीकरण वाचायला मिळते. सुरुवातीला विज्ञान तंत्रज्ञान विषयाला वाहिलेल्या या साइटवर आता जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारी माहिती उपलब्ध आहे. ती वाचकांना आवडेल याची खात्री वाटते.

## आता लाइक्स विसरा!


जगातील सर्वात मोठी सोशल साइट फेसबुक लवकरच सर्वांच्या आवडीचे एक खास फिचर बंद करणार आहे. हे फिचर आहे लाइक्सचे. फेसबुकने लवकरच हे फिचर बंद करणार असल्याची घोषणा केली आहे. आपण एखादा फोटो अथवा पोस्ट फेसबुकवर टाकल्यावर आपल्या फ्रेंड लिस्टमधील हजारो मित्र ती पोस्ट लाइक करतात. मात्र आता फेसबुक हे फिचर बंद करणार आहे. तुमच्या फोटो, व्हिडीओ अथवा पोस्टला किती लाइक्स आल्या आहेत, कोणी लाइक्स केले आहे हे तुमच्या मित्रांना व अन्य युजर्सला दिसणार नाही. युजर्स तुमची पोस्ट लाइक करू शकतील. मात्र फेसबुक लाइक काउंट हाइड म्हणजेच लपवणार आहे. हे फिचर्स कधी सुरू करण्यात येईल याबाबत अद्याप माहिती मिळालेली नाही. लाइकमुळे युजर्सची पोस्टमधील रूची कमी होते. त्यामुळे युजर्सनी पोस्टच्या विषयावर अधिक लक्ष देण्यासाठी हे करण्यात येत आहे. याआधी फेसबुकची मालकी हक्क असलेल्या इंस्टाग्रामवर देखील याआधी फोटो आणि व्हिडीओवरील लाइक्स आणि व्ह्यूज युजर्सला दिसणे बंद करण्याचा प्रयोग सहा देशांमध्ये केला जात आहे.

## युट्यूबवर भारतीय पोस्ट करतात सर्वाधिक बनावट व्हिडीओ!




युट्यूब या व्हिडीओ प्लॅटफॉर्मवर खोटे आणि अयोग्य माहिती असणारे व्हिडीओ टाकण्याच्या यादीत भारत सलग दुसऱ्यांदा प्रथम स्थानावर आहे. युट्यूबच्या व्हिडीओ कंटेटच्या नियमांचे उल्लंघन करण्याच्या यादीत भारत, अमेरिका, ब्रिटेन, रशिया आणि ब्राझील सर्वात पुढे आहे. याआधी जानेवारी-मार्च २०१९ मध्ये देखील भारत पहिल्या क्रमांकावर होता. ही नको असलेली कामगिरी भारतासाठी चिंतेचा विषय आहे. युट्यूब कम्युनिटी गाइडलाइन्स रिपोर्टनुसार, एप्रिल ते जून दरम्यान जगभरातून १.०८ करोड व्हिडीओ या प्लॅटफॉर्मवर टाकण्यात आले. यात सर्वाधिक बनावटी व खोटे व्हिडीओ भारतातून पोस्ट करण्यात आले आहेत. यानंतर अमेरिका, ब्राझील, इंडोनेशिया, मॅक्सिको आणि ब्रिटेनचा क्रमांक आहे. युट्यूबने म्हटले आहे की, द्वेष पसरवणारे तब्बल १ लाख व्हिडीओ हटवण्यात आले आहेत. तर हे व्हिडीओ टाकणारे १७ हजारांपेक्षा अधिक चॅनेल बंद करण्यात आले, तर ५० करोडपेक्षा अधिक कमेंट्सदेखील युट्यूबवरून काढून टाकण्यात आल्या आहेत. युट्यूबमधील एका स्वयंचलित सिस्टिमद्वारे व्हिडीओ हिंसा, द्वेष, खोटे, संदिग्ध आदी भागात विभागले जातात. या सिस्टमद्वारे युट्यूबवर येणाऱ्या अयोग्य कंटेटवर नियंत्रण ठेवता येते.

## तुम्हीच व्हा परफेक्ट व्हिडीओ एडिटर!



**स्मार्टफोनवरील कॅमेऱ्याच्या वाढत्या क्षमतेमुळे प्रत्येक घडामोडीचे चित्रीकरण करण्याकडे कल वाढत चालला आहे. विविध घटनांचे कॅमेऱ्यात व्हिडीओ रेकॉर्डिंग करण्यात येते. हॅण्डीकॅम किंवा डिजिटल कॅमेऱ्याने स्वत:च चित्रीकरण करणारेही अनेक आहेत. पण केवळ व्हिडीओ रेकॉर्ड करून तो क्षण कॅमेऱ्यात बंदिस्त करता येत नाही. त्या आठवणी अधिक खुलवण्यासाठी व्हिडीओ एडिटिंग करावेच लागते. सर्वसामान्य वापरकर्ते आपल्याला जमेल त्या पद्धतीने व्हिडीओ एडिटिंग करतात किंवा बाजारात कोणत्याही फोटोग्राफरकडे जाऊन व्हिडीओ एडिटिंग केले जाते. मात्र, पहिल्या पद्धतीत व्हिडीओचे संपादन चुकण्याची भीती असते तर दुसऱ्यात पैसे मोजावे लागतात. अशा वेळी संगणकावर उपलब्ध असलेले मोफत पण उपयुक्त व्हिडीओ एडिटर सॉफ्टवेअर एक चांगला पर्याय ठरू शकतात. अशाच काही महत्त्वाच्या व्हिडीओ एडिटर सॉफ्टवेअरविषयी....**

- विंडोज मूव्ही मेकर : कोणत्याही संगणकासोबत मोफत इन्स्टॉल होऊनच उपलब्ध असलेला विंडोज मुव्ही मेकर हे अतिशय उपयुक्त ॲप्लिकेशन आहे. संगणकावरील व्हिडीओ क्लिप्स केवळ क्लिक आणि ड्रॅग करून एडिटिंग करता येते. एका वेळी अनेक व्हिडीओ क्लिक आणि ड्रॅग केल्यानंतर ते निवडलेल्या क्रमाने दर्शवले जातात. त्यानंतर या व्हिडीओला साउंडट्रॅक जोडणे, कॅप्शन नोंदवणे, व्हिडीओची श्रेयनामावली तयार करणे अशा गोष्टी करता येतात. याशिवाय व्हिडीओ क्रॉप करणे, त्यातील रंगसदृशता कमी-अधिक करणे अशा नेहमीच्या सुविधाही विंडोज मूव्ही मेकरमध्ये उपलब्ध आहेत. हे व्हिडीओ सेव्ह करून थेट यू ट्यूबवर अपलोडही करता येतात.



- केट्स व्हिडीओ टूलकिट : रेकॉर्ड केलेल्या व्हिडीओचे एडिटिंग करणे अतिशय कौशल्याचे काम असते. मात्र, व्हिडीओची लांबी कमी करणे, ठराविक दृश्य कापणे, त्यातील रंगात कमी- अधिक करणे अशा गोष्टी आपल्याला सहज शक्य असतात. कॅट्स व्हिडीओ टूलकिटमध्ये या सर्व गोष्टी उपलब्ध आहेत. तुम्ही एका व्हिडीओचे दोन व्हिडीओ करू शकता किंवा दोन व्हिडीओ एकमेकांना जोडूही शकता. याशिवाय साउंडट्रॅक जोडणे, कॅप्शन नोंदवणे, श्रेयनामावली तयार करणे अशा गोष्टींसाठी या ॲप्लिकेशनमध्ये सुविधा उपलब्ध आहे.
- वी व्हिडीओ : अलीकडे अनेक ॲप्स किंवा सॉफ्टवेअर संगणकावर इन्स्टॉल न करता क्लाउड तंत्रज्ञानाच्या आधारे सर्व्हरवर साठवून तेथून हव्या त्या उपकरणावर वापरण्याची सोय उपलब्ध झाली आहे. संगणकावरील हार्डडिस्कची जागा व्यापली जाऊ नये म्हणून अनेक जण आपले सॉफ्टवेअर क्लाउडवर इन्स्टॉल करतात. त्यामुळे जागा वाचतेच. शिवाय हवी तेव्हा हव्या त्या संगणकावरून संबंधित सॉफ्टवेअर वापरता येते. अशाच सॉफ्टवेअरमध्ये वी व्हिडीओचे नाव घेता येईल. फेसबुक, ट्विटर, यू ट्यूबसारख्या समाजमाध्यम संकेतस्थळांवर व्हिडीओ शेअर करण्यासाठी हे सॉफ्टवेअर अतिशय उपयुक्त आहे. या ॲप्लिकेशनसोबत पाच जीबीची क्लाउड स्पेसही मिळते. यावर व्हिडीओ एडिटिंगसाठी स्पेशल इफेक्टही पुरवण्यात आले आहेत.
- एव्हिडमक्स : व्हिडीओ जोडणे, तोडणे, लोगो टाकणे, क्रॉप करणे, व्हिडीओ रोटेट करणे, रंगछटा बदलणे अशी अनेक कामे करणारा एव्हिडमक्स हा छोटा पण उपयुक्त व्हिडीओ एडिटर आहे. यामध्ये व्हिडीओ एडिटिंगच्या सामान्य सुविधा उपलब्ध आहेतच; पण स्पेशल इफेक्टचे पर्यायही येथे उपलब्ध आहेत.
- व्हीएसडीसी फ्री व्हिडीओ एडिटर : अवघ्या ३२७ केबी आकाराचा हा व्हिडीओ एडिटर छोटा असला तरी त्याची कार्यक्षमता दांडगी आहे. या सॉफ्टवेअरमध्ये एकाच वेळी अनेक व्हिडीओ ओपन करता येतात. कट, कॉपी, पेस्ट, क्रॉप, ट्रिम अशा नेहमीच्या पर्यायासोबतच साउंडट्रॅक जोडणे, कॅप्शन टाकणे अशा अनेक गोष्टी या एडिटरच्या मदतीने करता येतात. मात्र, या व्हिडीओ एडिटरवर फक्त एव्हीआय फाइल्सच एडिट करता येतात.

## शॉर्ट न्यूज

### अस्मिता मराठेला पुरस्कार प्रदान

**शेवगाव :** अपेक्षा मासिक परिवार, पुणे यांच्यातर्फे दिला जाणारा यावर्षीचा युवागौरव पुरस्कार लाडजळगाव (ता. शेवगाव) येथील युवा कवयित्री अस्मिता मराठे हीस प्रदान करण्यात आला. स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ जन्म उत्सवानिमित्त युवादिन विशेषांक प्रकाशन समारंभप्रसंगी, या पुरस्काराचे नुकतेच पत्रकार भवन, पुणे येथे वितरण करण्यात आले. अध्यक्षस्थानी निसर्ग उपचारतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर पोकळे पाटील होते.

### कारेगाव शिवारातून स्प्रिंकलरच्या गनची चोरी

**कारेगाव :** शिवारातील शेतातून स्प्रिंकलरच्या ९ गनची अज्ञात चोरट्यांनी चोरी केली. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील कारेगाव येथील सुरेंद्र गोरक्षनाथ पटारे यांच्या शेती गट न. ५२० मधून अज्ञात चोरट्याने ही चोरी केली आहे. या प्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक फौजदार पवार हे आहेत.

### रस्ता दुरुस्तीसाठी निधीची तरतूद केली

**श्रीरामपूर :** जलजीवन योजनेअंतर्गत वितरिका टाकताना सर्व रस्ते खोदले जाणार आहेत. या रस्त्यांसाठी आपण निधीची यापूर्वीच तरतूद करून ठेवली आहे. बेलापूरसह इतर ग्रामपंचायतींनी रस्त्यांच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करून आपल्याकडे प्रस्ताव दाखल करावेत, असे आवाहन आमदार लहू कानडे यांनी केले. बेलापूर-श्रीरामपूर रस्त्यावर सुमारे दीड कोटी रुपये खर्चाच्या निधीतून लावण्यात आलेल्या पथदिव्यांचा लोकार्पण सोहळा ज्येष्ठ कार्यकर्ते शिवाजी वाबळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला, त्यावेळी आमदार कानडे बोलत होते.

### शिक्षकांचे योगदान मोलाचे

**कोपरगाव :** शिक्षण हे परिवर्तनाचे साधन आहे. शिक्षक विद्यार्थ्यांना शिकविण्याबरोबरच त्यांच्यावर सुसंस्कार करून चारित्र्यसंपन्न विद्यार्थ्यांच्या पिढ्या घडविण्याचे महत्त्वाचे कार्य करत असतात. सैनिक आणि शिक्षक यांचे आयुष्य सारखे आहे. ते सतत आपल्या कुटुंबापेक्षा समाजाची अधिक वेळ सेवा करतात हे आपण कधीच विसरता कामा नये. शिक्षकांचे समाजासाठी, देशासाठी खूप मोठे योगदान असून, त्यांच्या कार्याची दखल वेळोवेळी समाजाने घेतली पाहिजे, असे प्रतिपादन सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष युवा नेते विवेक कोल्हे यांनी केले.

### रास्तापूर सोसायटीच्या उपाध्यपदी बोरबने यांची निवड

**राहाता :** तालुक्यातील पुणतांबा येथील रास्तापूर विविध कार्यकारी सोसायटीच्या उपाध्यक्षपदी गणपत खंडू बोरबने यांची बिनविरोध निवड करण्यात आहे. सोसायटीच्या सभागृहात सहाय्यक निबंधक आर. बी. सदाफळ यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते ही निवड करण्यात आली. बोरबने यांच्या नावाची सूचना अध्यक्ष साहेबराव शिंदे यांनी मांडली. त्यास सर्वांनी एकमुखी पाठिंबा दिल्यामुळे त्यांच्या निवडीची सदाफळ यांनी औपचारिक घोषणा केली.

# एसटी चालक-वाहकांना गणवेशासह नावाची पाटी व बॅच बिल्ला लावण्याचे बंधन!

**■ एसटी महामंडळाचे आगार व्यवस्थापकांना सक्त आदेश**
**■ कसूर केल्यास संबंधितांवर कडक कारवाईचा इशारा**

शिरुर : प्रतिनिधी

**एसटी चालक-वाहकांचे दैनंदिन कर्तव्य सुरू होण्यापूर्वी त्यांनी गणवेश, नावाची पाटी व बॅच बिल्ला लावणे महामंडळाच्या आदेशानुसार बंधनकारक आहे. मात्र अनेकदा चालक आणि वाहकांकडून या नियमाची पायमल्ली होते. आगाराचे वाहतूक नियंत्रक, वाहतूक पर्यवेक्षक यांनी त्यांची तपासणी करुन यामध्ये कोणी कसूर केल्यास एसटी महामंडळाच्या वतीने कडक कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.**



एसटी महामंडळ नियमानुसार सर्व चालक-वाहक यांनी कर्तव्यावर असताना त्यांना दिलेल्या गणवेशासह त्यावर नावाची पाटी व
बॅच बिल्ला लावणे बंधनकारक आहे. काही वेळेला एसटीच्या प्रवासादरम्यान प्रवाशांना चालक-वाहक यांच्या वर्तनाविषयी वाईट अनुभव येतो. त्यांच्याबाबत एसटी महामंडळास काही सूचना, तक्रार द्यायची असल्यास संबंधित चालक, वाहक यांच्या नावाची, बॅच बिल्ल्याची माहिती होत नाही. त्यामुळे प्रवाशांना त्यांच्या तक्रारी, सूचना एसटी महामंडळापर्यंत पोचविण्यास मोठा कालावधी लागतो. त्याचा विचार करून एसटी महामंडळाने आता जे चालक, वाहक कर्तव्यावर असतील, ते त्यांना दिलेल्या खाकी गणवेशातच नावाच्या पाटी व बॅच बिल्ल्यासह असतील, असे आदेश दिले आहेत. त्याच्या अंतिम अंमलबजावणीसाठी ३१ जानेवारीची अंतिम मुदत सर्व आगार व्यवस्थापकांना देण्यात आली आहे.

कर्तव्यावरील एसटी चालक-वाहकाने त्याच्या गणवेशात नावाची पाटी व बॅच बिल्ला लावणे महामंडळाच्या आदेशानुसार बंधनकारक आहे. अनेकदा ते गणवेश घालतात. मात्र बॅच, बिल्ला आणि नावाची पाटी लावत नसल्याचे दिसते. त्यामुळे प्रवाशांना ते कोण आहेत, याची ओळख पटत नाही. त्याचा विचार करून आता गणवेशासह संबंधित माहिती असणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यांनी त्याचे पालन न केल्यास संबंधित चालक- वाहकांसह त्या आगारांचे आगार व्यवस्थापक व वाहतूक पर्यवेक्षकीय कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे.


**एसटी महामंडळाच्या आदेशाची अंमलबजावणी !**

**ड्युटीवरील एसटी चालक-वाहकाने त्यांच्या गणवेशात नावाची पाटी व बॅच बिल्ला लावणे महामंडळाच्या आदेशानुसार बंधनकारक करण्यात आले आहे, त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याचेही महामंडळाने दिलेल्या आदेशात म्हटले आहे. त्यानुसार चालक-वाहकांचे दैनंदिन कर्तव्य सुरू होण्यापूर्वी याबाबतची खातरजमा आगाराचे वाहतूक नियंत्रक, वाहतूक पर्यवेक्षक यांनी करावी अशा सूचना शिरुर आगाराच्यावतीने देण्यात आल्या आहेत. त्याची तातडीने अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे.**

**– सौ. म. रा. गायकवाड**
**आगार व्यवस्थापक, शिरुर**

## वाचकांच्या लेखणीतून

### संत नामदेव मराठी साहित्य संमेलन



भक्त शिरोमणी संत नामदेवांच्या ७५४ व्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून येत्या ४ फेब्रुवारी रोजी नांदेड येथे नानक साई फाऊंडेशन आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संत नामदेव मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा.डॉ.जगदीश कदम यांची निवड झाल्याची बातमी वाचनात आली.

जगात जेवढे संत आहेत तेवढे एका हिंदुस्थानात आहेत. हिंदुस्थानात जेवढे संत आहेत तेवढे एकट्या महाराष्ट्रात आहेत असा लौकिक आहे. आपल्या मराठी संतमंडळातले ज्येष्ठ आणि आध्यात्मिक अधिकाराने श्रेष्ठ असलेले एक संत नामदेव.

नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी ।।

असा ध्यास घेतलेले संत नामदेव! त्यांनी महाराष्ट्रातच नव्हे; तर पंजाबातही भागवत धर्माची पताका फडकावली! म्हणूनच त्यांच्या काही काव्यरचनांचा शिखांच्या गुरु ग्रंथ साहेबात समावेश करण्यात आला आहे.

संत नामदेव संत ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधी सोहळ्याचे साक्षीदार होते. त्या सोहळ्याचे साक्षात वर्णन त्यांनी आपल्या अभंग गाथेत करून ठेवले आहे. ते आमच्या शालेय अभ्यासक्रमात नेमलेले होते. ज्ञाना, माझा धाकटा बंधू आणि शिष्यही, माझ्यापेक्षा वयाने लहान असूनही माझ्या आधी समाधी घेत आहे? याचे त्यांना मोठे वैषम्य वाटले! त्यामुळे त्या सोहळ्याला हजर असलेल्या सगळ्यांचीच हृदये गलबलून गेली! संत निवृत्तीनाथ, महान योगी पुरुष, त्यांच्या अंत:करणात बराच वेळ दाबून धरलेला मायेचा कढ बाहेर पडला! त्याचे संत नामदेवांनी मोठ्या रसाळ शब्दांत वर्णन केले आहे. संत नामदेव म्हणतात,

बांधल्या तळ्याचा सुटलासे आळा।
ओघ रानोमाळा धावताती।।

त्यामुळे संत नामदेवांसारख्या अधिकारी संताच्या नावाने नांदेडसारख्या पावन भूमीत संपन्न होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाला हार्दिक शुभेच्छा देऊयात.

**नाना ढवळे**
**८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर,जि. अहमदनगर.**

# नगरमध्ये ३७ हजार कुटुंबांचे सर्वेक्षण

**८९८ कर्मचाऱ्यांकडून घरोघरी जावून काम**

नगर : प्रतिनिधी

**नगर शहरात सर्वेक्षणासाठी महापालिकेचे ८९८ कर्मचारी गेल्या सहा दिवसांपासून नागरिकांच्या घरोघरी जाऊन काम करीत आहे. त्यानुसार शहरात तब्बल ३७ हजार कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. ३१ जानेवारीपर्यंत हे काम पूर्ण करायचे आहे. त्यासाठी नागरिकांनी या कर्मचाऱ्यांना माहिती देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी केले आहे.**




शहरात लवकरात लवकर सर्वेक्षणाचे काम पूर्ण करून त्याबाबतचा अहवाल राज्य मागासवर्ग आयोगाला सादर करण्यात येणार आहे. सुरूवातीला या कामात काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. काही अल्पशिक्षित कर्मचारी या कामासाठी नियुक्त करण्यात आले होते. त्यांना हे काम येत नसल्याने त्यांच्या जागी नव्याने कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परंतु, नागरिकांनी सर्वेक्षणासाठी येणाऱ्या नागरिकांना सहकार्य करावे, त्यांना योग्य ती माहिती द्यावी, असे आवाहन आयुक्त डॉ. जावळे यांनी केले आहे.

# नगरच्या अपूर्वा निषादच्या रामा ओ रामा गाण्याची सोशल मीडियावर धूम

**रामलल्ला प्रतिष्ठापनेचे औचित्य साधत गाणं रिलीज**

नगर : प्रतिनिधी

**सुप्रसिद्ध गायक सुरेश वाडकर यांच्याकडे अहमदनगर मधील अपूर्वा निषाद ही गायनाचे धडे गिरवत आहे.या दरम्यान अपूर्वा निषाद यांचा संपूर्ण महाराष्ट्रात "महानिर्माण घडवुया" या गाण्याने धुमाकूळ घातली आहे.याशिवाय अपूर्वा निषादला गायक डबू मलिक यांच्या"तुम कभी ना भुलना"या गाण्याने त्यांना संपूर्ण राज्यात एक वेगळीच ओळख दिली आहे.तर अपूर्वा निषाद यांचा आता अयोध्येत रामललाच्या मूर्तीचा अभिषेक निमित्त एक नवीन गीत रिलीज झाला आहे.**



"रामा ओ रामा" या नावाने नवीन गीत यु ट्यूब वर रिलीज झाले आहे.या गीताला सध्या जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे.अपूर्वा निषाद यांच्या या गीताचे वैशिष्ट्य म्हणजे स्वत: अपूर्वा निषाद यांनी हे गीत कंपोझ करून त्यांनी गायले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अयोध्या सजावट पाहात असताना अपूर्वा निषाद यांचे गीत वाजविले गेले आहे.याच बरोबर सोशल मीडियावर असणारे अध्यात्मिक पेज तसेच केंद्राने आपल्या सोशल नेटवर्किंग मध्ये "रामा हो रामा" गाणे ट्रेंडिंग झाल्याचे कौतुकास्पद विधान केले आहे.

अयोध्येच्या प्रभू श्रीरामाला नमन करण्यासाठी प्रसिद्ध गायिका अपूर्वा निषाद यांच्या आवाजातील नवीन गाणं 'रामा ओ रामा' श्रीराम मूर्ती प्रतिस्थापनेच्या वेळी सगळीकडे वाजले गेले,अपुर्वा हि नगरचे प्राध्यापक व निवेदक ,गायक संदीप भुसे व सारडा कॉलेज मधील प्राध्यपिका स्मिता भुसे यांची कन्या आहे

# अशोककाका कटारिया यांना ७ दिवस पोलीस कोठडी

**नगरच्या न्यायालयाचा निर्णय**

नगर : प्रतिनिधी

**नगर अर्बन बँकेतील आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी सोमवारी पहाटे आळेफाटा जि. पुणे येथून अटक करण्यात आलेले बँकेचे माजी चेअरमन अशोकलाल माधवलाल कटारिया यांना नगरच्या न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.**




गेल्या काही महिन्यांपासून अर्बन बँकेतील गैरव्यवहार गाजत असून गैरव्यवहाराप्रकरणी पोलीसांनी २६ जानेवारी रोजी बँकेचे माजी उपाध्यक्ष अनिल कोठारी व माजी संचालक मनेश साठे यांना अटक केली. २ फेब्रुवारीपर्यंत त्यांना पोलीस कोठडी देण्यात आली आहे. दरम्यान, मा. खा. स्व. दिलीप गांधी यांच्या कुटूंबियांच्या अडचणींमध्ये वाढ झाली असून सध्या गांधी कुटूंबिय नगरमध्ये नसल्याची माहीती आहे. या गैरव्यवहार प्रकरणी सुरूवातीस बँकेचे अधिकारी प्रदीप पाटील व राजेंद्र लुनिया यांना अटक करण्यात आली होती. सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत.

या गुन्हयाची पोलीसांकडून चौकशी सुरू असताना व्यक्ती मोठी असल्याने फॉरेन्सिक ऑडिट करण्यात आले होते. त्यानंतर या गैरव्यवहारात कोणाचा सहभाग आहे या बाबी पुढे आल्या व तपासाची चक्रे वेगाने फिरू लागली आहेत.

फॉरेन्सीक ऑडीट नंतर बँकेतील घोटाळा २९१ कोटी २५ लाख रूपयांचा असल्याची तसेच त्यात १०२ आरोपींचा सहभाग असल्याची माहीती पोलीसांच्या हाती आली आहे. पोलीसांनी धरपकड सुरू केल्याने माजी पदाधिकारी व संचालकांमध्ये एकच खळबळ उडाली असून बहुतांश संचालक फरार झाले आहेत.

(पान १ वरून)

## घनदाट मामा म्हणाले, लंके साहेब खासदारकी लढवा!

भुमिपुजन व लोकार्पण आ. नीलेश लंके यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी अध्यक्षपदावरून घनदाट हे बोलत होते.

तुमच्या निवडणूकीत आमच्या गावातील एकही मत बाहेर जाणार नाही असे सांगत यावेळी बोलताना घनदाट यांनी श्री क्षेत्र काळभैरवनाथ मंदिराच्या १ कोटी रूपयांच्या सभागृहाची तसेच बगिचाची मागणी केली. आ. लंके यांनी दोन्ही कामांना निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली. दरम्यान, कोरोना कालखंडामध्ये स्वत:चा जीव धोक्यात घालून आ.लंके यांनी केलेल्या कामाचे घनदाट यांनी कौतुक केले. या गावात माझं लहानपण गेले त्यामुळे मी या गावाला कधीही विसरत नाही. नांदूरपठारचा विकास संदीप चौधरी यांनी एक व्हिजन ठेवून केला. माझे स्वप्न त्यांनी पुर्ण केल्याचे सांगत घनदाट यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी संदीप घनदाट, बापू शिर्के, ॲड. राहुल झावरे, बाळासाहेब खिलारी, श्रीकांत डेरे, प्रविण साबळे, अनिल गंधाक्ते, सरपंच श्रामीणी चौधरी, रविंद्र राजदेव, हरी देशमाने, सत्यम निमसे, सोनाली आग्रे, कोमल आग्रे, सुरेश आग्रे, प्रमिला दिवेकर, सुनील राजदेव, गोरख पानसरे, चित्रा घोलप, चेअरमन मदन देशमाने, बबन गाढवे, नवनाथ घोलप, दत्ता देशमाने, शाखा प्रमुख संतोष आग्रे, विलास घोलप, दत्ता चौधरी, सुर्यकांत वलवे, ज्ञानदेव चौधरी, विठ्ठल चौधरी, भानुदास आग्रे, रंगनाथ आहेर, आनंथा पानसरे आदी उपस्थित होते. रविंद्र राजदेव यांनी प्रास्ताविक, बाबाजी चौधरी यांनी सुत्रसंचलन तर रामदास वलवे यांनी आभार मानले.

**चौधरी यांचे कौतुक**

यावेळी सामाजिक कार्यकर्ते संदीप चौधरी तसेच त्यांच्या पत्नी सरपंच श्रामीणी चौधरी यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. नांदूरपठारच्या इतिहासात संदीप चौधरी यांनी पाठपुरावा करून कोटयावधी रूपयांची विकास कामे मार्गी लावली. त्याबददल मा. आ. सिताराम घनदाट यांनी चौधरी यांचे कौतुक केले.

**आम्ही धन्य झालो !**

सन १९५६ पासूनचे गावचे सरपंच, उपसरपंच, चेअरमन, व्हा. चेअरमन, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष यांचा यावेळी ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला. सन्मानाने हे माजी पदाधिकारी भारावले. आम्ही धन्य झाल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या.

## वाचकांच्या लेखणीतून

### सुंदर हस्ताक्षर ही चळवळ व्हावी !

सुंदर हस्ताक्षर, दुसऱ्याला समजेल, उमजेल इतकं टापटीप, वळणदार असण ही एक श्रीमंतीच. मात्र या श्रीमंतीकडेच सगळीकडून दुर्लक्ष होतय असं म्हटल्यास वावगे होणार नाही यात प्रामुख्याने शाळाही अपवाद नाहीत. या पार्श्वभूमीवर भावी पोलिसांसाठी सुंदर हस्ताक्षर सराव, प्रशिक्षण वर्ग राबविण्यात येत असल्याची समाधान देणारी बातमी वाचनात आली.




खरंतर बालविद्यार्थी दशेतील पहिल्या पायरी पासूनच प्रत्येक शाळेतून सुंदर हस्ताक्षरांची जाणीव, महत्त्व , गोडी लागण्यासाठी विविध उपक्रम राबविणे गरजेचे वाटते परंतु असं घडताना दिसत नाही. शाळांमधून सुंदर हस्ताक्षर सराव वर्ग सुरू होणे जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच सामाजिक संस्थांनी विविध माध्यमांच्या द्वारे सुंदर हस्ताक्षर चळवळ उभी केली तर उद्याच्या जगात विविध क्षेत्रात प्रवेश करणारी भावी पिढी एक अक्षर श्रीमंती घेऊनच वावरेल.

**विश्वनाथ पंडित**

# लोकसभेसाठी भाजप लागले कामाला !

**महाराष्ट्राचे राजकारण, केंद्रात हालचाली**

मुंबई : प्रतिनिधी

**महाराष्ट्राच्या राजकारणाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या घडामोडी सुरू आहेत.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार येत्या आठवड्यात दिल्लीला जाणार आहेत. या आठवड्यात दिल्लीत अतिशय महत्त्वाची बैठक बोलावण्यात आली आहे, अशी माहिती सुत्रांकडून दिली जात आहे.**

**लोकसभेच्या अनुषंगाने जोरदार तयारी**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत तयारीला सुरुवात झाली आहे. भाजपकडून जोरदार तयारी सुरु आहे. याच तयारीचा भाग म्हणून दिल्लीत भाजपप्रणित एनडीएची दिल्लीत अतिशय महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीसाठीचे महाराष्ट्र सरकारमधील हे तीनही सर्वात प्रमुख नेते दिल्लीला जाणार आहेत.

**जागा वाटपाबाबत चर्चेची शक्यता**

येत्या आठवड्यात दिल्लीत आयोजित करण्यात येत असलेल्या एनडीएच्या बैठकीत लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपाबाबत चर्चा होणार आहे. या बैठकीत जागावाटपाबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांकडून दिली जात आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत ही बैठक पार पडणार आहे. विशेष म्हणजे बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यासह एनडीएमधील घटक पक्षांचे प्रमुख नेतेदेखील या बैठकीत सहभागी होणार आहेत.

**महाराष्ट्रात महायुतीचं जागावाटप कसे?**




देशभरातील बहुतेक विरोधी पक्ष हे एकत्र येताना दिसत आहेत. या विरोधकांच्या आघाडीचे इंडिया आघाडी आघाडी असे नाव त्यांनीच ठरवले आहे. महाराष्ट्रातील शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या नेतृत्वातील गट आणि काँग्रेस हे पक्ष इंडिया आघाडीतील घटक पक्ष आहेत. याशिवाय वंचित बहुजन आघाडी आणि इतर लहान पक्षांसोबतही विरोधी पक्षांचे बोलणं सुरु असल्याची माहिती मिळत आहे.

**तरीही सत्ताधाऱ्यांना मविआचे आव्हान**

देशात इंडिया आघाडीचा जन्म झाला असला तरी या आघाडीला महाराष्ट्रात महाविकास आघाडी अशी ख्याती आहे. या महाविकास आघाडीची राज्यात अडीच वर्ष सत्तादेखील होती. दरम्यानच्या काळात महाविकास आघाडीतील दोन घटक पक्षांमध्ये मोठी फूट पडली आणि आघाडीची सत्ता गेली. आता परिस्थिती वेगळी आहे. पण तरीदेखील सत्ताधाऱ्यांसाठी त्यांचं कडवं आव्हान असणार आहे.

# न्यायालयाच्या निर्णयानंतर ही शेतकऱ्यांना रस्त्यासाठी न्याय मिळेना

■ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या विरोधात अवमान याचिका दाखल करणार ■ ॲड.प्रतीक्षा काळे यांची माहिती



सुपा : प्रतिनिधी

**शिवरस्ता शेतरस्त्यांच्या प्रश्नावर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयाच्या ॲड.प्रतीक्षा काळे व महाराष्ट्र राज्य शिवपानंद चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांच्या उपस्थितीत अहमदनगर येथील राज चेंबर्स येथे शेतकऱ्यांच्या वाढत्या शेतरस्त्याच्या समस्या व मार्गदर्शनाची होणारी मागणी यामुळे शेतकऱ्यांची विशेष बैठक नगरमध्ये आयोजित करण्यात आली.**

यावेळी जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते. यावेळी शिवपानंद शेत रस्ता चळवळीच्या माध्यमातून गावातील जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा प्रशासकीय न्यायालयीन संघर्ष सामूहिक लढ्यातून सोडवण्यासाठी चळवळीच्या माध्यमातून जिल्हा संघटन उभे करत शेतकऱ्यांना अर्ज बनवण्यापासून प्रशासकीय न्यायालयीन संघर्षाबरोबर जनआंदोलनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासह शेवटच्या शेतकऱ्याला शेतीला शेत रस्ता मिळून देणारच तो पर्यंत लढा चालु राहणार व प्रशासकीय यंत्रणेच्या नाकर्तेपणामुळे अनेक जमिनी शेतरस्त्या अभावी नापीक पडल्या असून अनेक शेतजमीनी शेतकऱ्यांना विकाव्या लागल्या.

शेतरस्त्या अभावी नापीक पडलेल्या जमिनींची नुकसान भरपाई शासनाला द्यायला भाग पाडू असे यावेळी शरद पवळे यांनी बैठकीत बोलताना सांगितले. त्याचबरोबर शेतकऱ्यांची न्यायालयीन बाजू प्रभावीपणे मांडून शेतकऱ्यांना मोठा आधार ॲड.प्रतीक्षा काळे यांनी दिला असून यावेळी उपस्थित प्रत्येक शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेत मोलाचे मार्गदर्शन काळे यांच्याकडून करण्यात आले. त्यामुळे समाधानकारक मार्गदर्शन व मोलाची साथ देणाऱ्या काळे यांचा जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून सन्मान करण्यात आला.

**शेत रस्त्या संदर्भात मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे निकालानंतर अद्यापही शिवपानंद शेत रस्त्याच्या प्रश्नाची प्रशासकीय पातळीवर नोंद घेतली गेली जात नाही ही खेदाची बाब असून प्रशासकीय अधिकारी कागदोपत्री कृती आराखडे तयार करून शेतकऱ्यांची दिशाभूल करत असल्याचे सातत्याने लक्षात येत आहे, मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने सामाजिक कार्यकर्ते शरद पवळे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर निर्णय देताना ६० दिवसाच्या आत शिवशेत पानंद रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्या संदर्भात प्रशासकीय अधिकाऱ्यांना आदेशित केले होते परंतु सहा महिन्यांचा कालावधी उलटूनही सदर आदेशाची अंमलबजावणी झाली नसल्याने सदर प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या विरोधात उच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल करू, अधिकारी जाणून-बुजून शेतकऱ्यांना वेठीस धरत असतील तर अवमान याचिका दाखल करण्याविना पर्याय नाही.**

**ॲड. प्रतीक्षा काळे**
**मुंबई उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपीठ**

यावेळी नाथा शिंदे, सागर सोनटक्के, ॲड.कडूस पाटील, रामदास लोणकर, दशरथ वाळुंज, भाऊसाहेब वाळुंज, बबन गुंड, जगन्नाथ कणसे, संजय साबळे, रावसाहेब शिकारे, राजेंद्र देठे, सुनील भालके, दीपक गवांदे, ज्ञानदेव जगताप आदीसह मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.

# सीताबाई कॉलेजचा आरोग्य शिबीर उपक्रम सामाजिक हिताचा

निघोजला श्रमसंस्कार शिबिर संपन्न

निघोज : प्रतिनिधी

**शिरूर येथील सीताबाई थिटे डी फार्मसी कॉलेजने निघोज येथे आरोग्य शिबीर घेऊन समाजहिताचे काम केले असून श्रमसंस्कार शिबीराच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यमय उपक्रम राबवीत कॉलेजने जनतेच्या सुखा दु :खात सहभागी होऊन समाजहित करण्याचे काम केले असल्याचे आहे.**



■ शिरूर येथील सीताबाई थिटे डी फार्मसी कॉलेजच्या श्रमसंस्कार शिबीर निमित्ताने झालेल्या विविध कार्यक्रमात लोकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.
( छाया : संदीप ईधाटे ,निघोज )

सीताबाई थिटे कॉलेजचे निघोज येथे गेली तीन दिवसांपासून श्रमसंस्कार शिबीर सुरु असून यामध्ये ग्रामअभियान ग्रामस्वच्छता अभियान, आरोग्य शिबीर , वाडी वस्तीवर जाऊन विद्यार्थ्यांनी लोकांच्या आरोग्याच्या अडचणी जाणून घेउन प्रश्नांचे निराकरण केले तसेच गाव व परिसरातील विकासकामांचे मुल्यमापन करीत लोकप्रबोधन करीत जनतेला विकासाभिमुख संदेश देत विकासकामांची माहिती दिली.

यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, निघोज ग्रुप ग्रामपंचायत व ग्रामस्थ, पारनेर तालुका पत्रकार संघ व राज्य मराठी पत्रकार संघ यांनी या सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शिरूर येथील वेदांत हॉस्पिटलचे संचालक डॉ.आकाश सोमवंशी , नेत्र चिकित्सक डॉ. दर्शन ढगे तसेच डॉ विक्रम वराळ यांनी यावेळी अस्थिरोग निदान तसेच आरोग्य विषयक तपासणी करीत रुग्णांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी सचिन गाडे, बाबाजी गलांडे, सतिश शिंदे यांनी रुग्णांना मोफत औषधे उपलब्ध करून दिली. शिवव्याख्याते सागर भालके यांनी विद्यार्थ्यांना शिवछत्रपतींचा विचार व आचार प्रत्यक्ष जिवनात आणून समाजाभिमुख काम करण्याचे आवाहन केले. मंगेशकर हॉस्पिटलचे डॉ. निलेगावकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आरोग्य आणी समाज यावर प्रबोधन केले.

यावेळी भास्कर कवाद, व्यवसायिक मोहन कवाद, पत्रकार विजय रासकर, पत्रकार संदीप ईधाटे, पत्रकार योगेश खाडे, आनंद भुकन यांनी या शिबिरासाठी विशेष सहकार्य केले. संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र थिटे, धनंजय थिटे, कॉलेजचे प्राचार्य डॉ द्वारकादास बाहेती, कार्यक्रम अधिकारी मोनाली परभाणे यांनी शिक्षण संस्थेची माहिती देत निघोज ग्रामस्थ व विविध संस्था करीत असलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद व्यक्त करीत आभार मानले.

संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील, सरपंच चित्राताई वराळ पाटील, उपसरपंच माऊली वरखडे, मंगेश लाळगे, अस्लमभाई इनामदार,मंगेश वराळ यांनी या कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे कौतुक करीत श्रमसंस्कार शिबीराच्या माध्यमातून होत असलेल्या सामाजिक कामांचे कौतुक करीत हे शिबीर म्हणजे जनतेला प्रेरणामय सामाजिक संदेश असल्याचे सांगितले.

# राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत इन्स्पायर ब्रेन पॉवर अबॅकसचे विद्यार्थी चमकले

यशवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन गुणगौरव

टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी

**इन्स्पायर अबॅकस अकॅडमी मार्फत नगर या ठिकाणी राष्ट्रीय स्तरावरील ऑफलाइन अबॅकस स्पर्धेचे आयोजन करून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.**




या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत ब्रेन पॉवर अबॅकस क्लासेसचे विद्यार्थी घवघवीत यश क्लासच्या संचालिका पूजा गुंजाळ मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली संपादित केले आहे या स्पर्धेसाठी देशभरातून ७२० विद्यार्थी सहभागी झाले होते. इन्स्पायर अबॅकस अकॅडमी ही शालेय विद्यार्थ्यांसाठी शास्त्रीय संकल्पनेवर आधारित परिपूर्ण बौद्धिक विकास करणारे केंद्र असून गरजू व होतकरू महिलांसाठी अबॅकस व वैदिक गणिताचे प्रशिक्षण देणारे संस्था आहे इन्स्पायर अबॅकस अकॅडमीने संचालिका पूजा गुंजाळ यांना बेस्ट टीचर अवॉर्डने सन्मानित केले.

राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देशभरातून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ब्रेन पॉवर अबॅकस क्लासेसचे विद्यार्थी चॅम्पियन तन्वी शरद आबुज हिने पाच मिनिटांमध्ये १३४ उदाहरणे सोडवले. प्रांजल आबुज (प्रथम क्रमांक) ईश्वरी शिंदे,इशिका शिंदे वीरा फंड, आकांक्षा महांडुळे (द्वितीय क्रमांक ), रुद्रांश शिंदे,समीक्षा महांडुळे सोहम आबुज( तृतीय क्रमांक) सोहम महांडुळे,सार्थक महांडुळे (चौथा क्रमांक) वेदश्री महांडुळे (पाचवा क्रमांक )सेजल शिंदे, कृष्णा श्रीमंदिलकर, श्रुती शिंदे (नऊ क्रमांक) तसेच उदय फंड अथर्व बरबडे आणि साक्षी शिंदे या विद्यार्थ्यांना रँक अनुसार पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

सारोळा अडवाई येथे अबॅकस क्लास उपलब्ध करून शिक्षण देणाऱ्या आदर्श शिक्षिका मा. पूजा गुंजाळ मॅडम यांचे परिसरातून कौतुक होत आहे.

# वेताळबाबा स्टेडियम प्रसिद्धीसाठी पत्रकारांचे मोठे योगदान

मेजर विकास वराळ यांचे गौरोद्गार

निघोज : प्रतिनिधी

**वेताळबाबा स्टेडियम सुशोभीकरण करण्यासाठी ग्रामस्थ मुंबईकर मंडळ, क्रीडाप्रेमी जनता तसेच पत्रकार यांचे फार मोठे योगदान असून पत्रकारांनी प्रसिद्धी देऊन वेताळबाबा स्टेडियमचा नावलौकिक राज्यात केल्याने लोकसहभागातून मोठी मदत झाल्याचे प्रतिपादन वेताळबाबा स्टेडियम सुशोभीकरण समीतीचे प्रमुख पदाधिकारी मेजर विकास वराळ यांनी व्यक्त केले आहे.**




वेताळबाबा स्टेडियमवर पारनेर तालुका पत्रकार संघ व पारनेर तालुका मराठी पत्रकार संघ सदस्य व पदाधिकारी यांचा सत्कार सुशोभीकरण समितीचे प्रमुख मेजर विकास वराळ मेजर अमोल ठुबे, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे मार्गदर्शक सुनिल पवार, सहाय्यक कामगार तलाठी सुनिल उचाळे, अल्पसंख्याक समाजाचे नेते अस्लमभाई इनामदार यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, उपाध्यक्ष भास्करराव कवाद, राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष विनोद गायकवाड, माजी अध्यक्ष सतीश रासकर, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, कार्याध्यक्ष शिरीषजी शेलार,उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे, माजी उपाध्यक्ष संतोषशेठ ईधाटे, कार्यकारिणी सदस्य अमोल खिलारी, शहराध्यक्ष योगेश खाडे, शहराध्यक्ष आनंदजी भुकन, खजिनदार विजय रासकर, सहसचिव अविनाश भांबरे, वसंत रांधवण, संदीप गाडे, संदीप ईधाटे, रोहन उनवणे, जयसिंग हरेल आदी पत्रकारांचा यावेळी वेताळबाबा स्टेडियम सुशोभीकरण समितीच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

मेजर वराळ यावेळी म्हणाले गेली आठ महिन्यांत या स्टेडियमचे काम लोकसहभागातून करताना पत्रकार मित्रांनी मोठ्या प्रमाणात मदत केली आहे सामाजिक कामे करताना पत्रकारांचे मोठे सहकार्य मिळणे अपेक्षित असते अशाप्रकारे पत्रकारांनी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले आहे म्हणून त्यांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी त्यांचा सत्कार करणे हे आपले कर्तव्य आहे.

पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे यावेळी म्हणाले वेताळबाबा स्टेडियम सुशोभीकरण समीतीचे अध्यक्ष कॅप्टन विठ्ठलराव वराळ, मेजर विकास वराळ, मेजर अमोल ठुबे तसेच आजी माजी सैनिक संघटना निघोज ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ व क्रीडाप्रेमी जनता यांनी लोकसहभागातून हे स्टेडियम तयार करून एक तालुक्यात एक नंबरचे काम केले आहे आजी माजी सैनिक संघटना हे सामाजिक काम करणारे समाजसेवी संघटना असून त्यांच्या कामाला प्रसिद्धी देणे पत्रकारांचे नैतिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. मेजर अमोल ठुबे यांनी यावेळी उपस्थितांचे आभार मानले.

# पारनेर पब्लिक स्कूलमध्ये राष्ट्रीय मतदार दिन साजरा

जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांनी काढली रॅली




पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर येथील पारनेर पब्लिक स्कूल व ज्यु.कॉलेज पारनेर येथे २५ जानेवारी २०२४ रोजी राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला असे विद्यालयाचे प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी सांगितले.**

या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रमुख उपस्थितीत तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार सौ. गायत्री सौंदाणे, नायब तहसीलदार श्री. गणेश आढारी, तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय वाघमारे होते. नायब तहसीलदार गणेश आढारी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले तेव्हा ते मुलांना संबोधित करताना म्हणाले की मतदार हाच देशाचा नागरिक असून त्याला सरकार निवडण्याचे अधिकार आहे म्हणून नवीन मतदार व्हाव व स्वतःचा अधिकार ओळखा. तसेच तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय वाघमारे बोलत असताना म्हणाले की मतदार हेच चांगल्या प्रतिनिधीची निवड करु शकतो म्हणून आपण मतदार झालो पाहिजे.

कार्यक्रमाची सांगता तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार सौ.गायत्री सौंदाणे यांचे हस्ते करण्यात आली त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की नवीन मुलांनी मतदार होऊन आपला हक्क बजावून योग्य प्रशासकाची निवड करावी ती निवड करताना कोणाच्याही दबावाखाली न येता किंवा लाच न घेता निर्भिडपणे हक्क बजवावा. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यालयातील मुलांनी रॅली काढली होती.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यालयाचे प्राचार्य गिताराम म्हस्के, संस्थेच्या अध्यक्षा सौ.सविता म्हस्के, नितीन गाडगे,सचिन वाघ,रोहीदास वळसे उपस्थित होते.

# आजी माजी सैनिक संघटनेचे कार्य कौतुकास्पद

प्रभाकरशेठ कवाद यांचे प्रतिपादन




निघोज : प्रतिनिधी

**देशसेवा करताना देशाच्या संरक्षणासाठी योगदान देणाऱ्या पारनेर तालुक्यातील आजी माजी सैनिक संघटनेचे कार्य कौतुकास्पद असून सेवानिवृत्ती नंतरही हे माजी सैनिक समाजहितासाठी योगदान देऊन खऱ्या अर्थाने सामाजिक सेवा करीत सेवाभाव करीत असल्याचे प्रतिपादन मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकरशेठ कवाद यांनी व्यक्त केले आहे.**

आजी माजी सैनिक संघटनेचे नूतन कार्यालयाचे उद्घाटन कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा शांताराम लंके यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी कवाद बोलत होते. यावेळी कॅप्टन विठ्ठलराव वराळ, मेजर विकास वराळ, मेजर अमोल ठुबे, मेजर पोपटराव लंके, मेजर गोपाळराव वराळ पाटील, बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष वसंत कवाद, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील, दुष्काळ निवारण समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर उर्फ बाळासाहेब लंके, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेशशेठ लाळगे, माजी सरपंच चंद्रकांत लामखडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे संघटक ॲड बाळासाहेब लामखडे, विश्वस्त भास्करराव वराळ पाटील, निघोज सोसायटीचे अध्यक्ष सुनिल वराळ, उपाध्यक्ष शांताराम लाळगे, माजी उपाध्यक्ष वसंत ढवण, भाजपचे ओबीसी सेलचे तालुका अध्यक्ष मनोहर राउत, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, उपाध्यक्ष भास्करराव कवाद, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, माजी चेअरमन रामदास वरखडे, आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण, संदीप पाटील उद्योग समूहाचे अध्यक्ष आप्पासाहेब वराळ पाटील, पारनेर तालुका भाजपचे सांस्कृतिक विभागाचे अध्यक्ष विलासराव हारदे, युवा नेते गणेश लंके, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका प्रवक्ते अस्लमभाई इनामदार, युवा नेते गणेश लंके, सहाय्यक कामगार तलाठी सुनिल उचाळे, गजाभाऊ ठुबे,हरेश ससाणे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आजी माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी कॅप्टन विठ्ठलराव वराळ म्हणाले की ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी सैनिक म्हणून देशसेवा करताना मोठे योगदान दिले आहे नंतर त्यांनी समाजसेवेच्या माध्यमातून देश कल्याणार्थ काम केले त्यांचेच अनुकरण करीत आजी माजी सैनिक संघटना लोकांच्या कल्याणासाठी काम करीत असून सेवाभाव करताना विकासाभिमुख कामांना पाठबळ देऊन परिसर विकास करणे हेच आमचे उद्दिष्ट आहे. यावेळी वेताळबाबा स्टेडियमचे सुशोभीकरण समितीचे पदाधिकारी मेजर विकास वराळ यांनी सांगितले की क्रीडाप्रेमी जनतेनी आमच्यावर विश्वास ठेऊन वेताळबाबा स्टेडियम सुशोभीकरण करण्यासाठी मोठी आर्थिक मदत केली म्हणून तालुक्यातील एक नंबरचे स्टेडियम झाले आहे. यावेळी मेजर विकास वराळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# सागर मैड यांची भाजपा युवा मोर्चाच्या जिल्हा सरचिटणीसपदी निवड

पक्ष संघटना वाढीवर भर देणार : मैड

सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील सुपा येथील सागर भास्करराव मैड यांची भारतीय जनता युवा मोर्चाच्या जिल्हा सरचिटणीस पदी नुकतीच निवड करण्यात आली. भारतीय युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय शिवाजीराव कर्डिले यांनी मैड यांना नियुक्तीचे पत्र दिले.**



सागर मैड हे भाजपाचे २०१४ पासुन निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. मैड यांनी २०२१ रोजी सुपा ग्रामपंचायत उपसरपंच व भारतीय जनता युवा मोर्चाच्या पारनेर तालुका सरचिटणीस म्हणून त्यांनी काम पाहिले आहे, त्यांचे संघटन कौशल्य चांगले असल्याने भाजपच्या वरिष्ठांनी सुपा गटासह पारनेर तालुक्यात पक्ष वाढवण्यासाठी प्रामाणिक पणे प्रयत्न करत आहेत. आपल्या पदाच्या माध्यमातून त्यांनी सर्व सामान्यांचे अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. त्यांच्या पाठपुराव्यातून व अथक प्रयत्नातून सुपा येथे भरीव निधी मंजूर करण्यात आला असून ते भविष्यात पक्ष संघटन मजबूत करतील व पक्षसंघटनेसाठी प्रयत्न करतील असा विश्वास व्यक्त केला आहे. त्यांच्या रूपाने सुपा गटाला नव्हे तर पारनेर तालुक्याला एक तरूण उमदा नेतृत्व मिळाले आहे.

मैड यांनी भाजप युवा मोर्चाचे तालुका सरचिटणीस असताना विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, ग्रामस्थांना बसण्यासाठी बाकडे, गोरगरीब व गरजूंना गॅस सिलिंडरचे वाटप, गरजू रूग्णांना उपचारासाठी शासकीय मदत, सुपा औद्योगिक वसाहत ते पवारवाडी नगर - पुणे महामार्गावर ३ कोटींची स्ट्रीट लाईटसाठी मंजुरी, कोरोना काळात गोरगरीबांना औषधांसह मास्क सॅनिटायझरचे वाटप यासह सुपा परीसरातील विविध विकास कामांना मंजुरी मिळवून दिली आहे.

**भारतीय जनता पक्षाने माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला तडा जाऊ न देता पुढील काळात पक्षाचे ध्येयधोरण सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणार असून संघटन वाढविणार आहे, सर्वसामान्यांचे प्रश्न शासन दरबारी मांडणार व सर्वांना बरोबर घेवून विकास कामांसाठी प्रयत्नशील राहणार आहे.**

**सागर मैड**
**जिल्हा सरचिटणीस भाजप युवा मोर्चा.**

सागर मैड यांच्या निवडीबद्दल महसूलमंत्री तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, खासदार सुजय विखे पाटील, मा. मंत्री शिवाजीराव कर्डीले, भाजप तालुकाध्यक्ष राहूल पाटील शिंदे यांनी सागर मैड याचे अभिनंदन केले आहे.

# राळेगणसिद्धी विद्यालयात ग्रंथदिंडीसह महावाचन उपक्रम

विविध विषयांवर निबंध व वक्तृत्त्व स्पर्धा
भाषा संवर्धन पंधरवड्याचे औचित्य



राळेगणसिद्धी : प्रतिनिधी

**येथील श्री संत निळोबाराय विद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त ग्रंथदिंडी व महावाचन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, अशी माहिती मराठी विभाग प्रमुख महेंद्र गायकवाड यांनी दिली.**

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त विद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात मराठी भाषेसंबंधी विविध विषयावर विविध गटात निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. शनिवारी गावातून ग्रंथदिंडी काढण्यात आली. यात बालशिवाजी, जिजाऊ व मावळ्यांची वेशभूषा करून सहभागी झालेले विद्यार्थ्यांचे पथकाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ग्रंथदिंडीच्या मिरवणूकीत विद्यार्थ्यांचे लेझीम व झांज पथक पारंपरिक महाराष्ट्रीयन वेशभूषेसह सहभागी झाले होते. राळेगणसिद्धीचे सरपंच जयसिंगभाऊ मापारी, माजी सरपंच लाभेश औटी, संस्थेचे संचालक गणपतराव पठारे, निवृत्ती मापारी, मेजर नानाभाऊ मापारी यांच्यासह प्रमुख ग्रामस्थांनी ग्रंथदिंडीतील ग्रंथांचे पूजन केले.

ग्रंथदिंडीनंतर झालेल्या महावाचन उपक्रमात सर्व विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सोपान घाणे होते. यावेळी ज्येष्ठ शिक्षक रमेश गारुडकर, राजू ओहोळ, महेंद्र गायकवाड, प्रा. सिद्धेश्वर जवक यांनी वाचनाचे महत्त्व विशद केले. ग्रंथदिंडीचे आयोजन सांस्कृतिक विभागाचे सुभाष पठारे, संतोष तरटे, हरिभाऊ गुळवे, ग्रंथपाल सुजाता भालेकर, प्रा. दिपक फापाळे, प्रा. कल्याणी गाडे यांनी केले होते. वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण प्रा. गीतांजली सोनवणे व तुळसाबाई फटांगडे यांनी केले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com